वर्तमान पत्रात प्रसिध्द करावयाचा संक्षिप्त जाहिरातीचा मसूदा


शासन अनुदानीत | डि.टी.ई. कोड नं.-२०२५ व एम.एस.बी.टी.ई.कोड नं.-००५२

पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, आलूर द्वारा संचलित | स्थापना १९७३

# चन्नबसवेश्वर (पॉलिटेक्निक) कॉलेज, लातूर

बसवेश्वर चौक, कव्हा रोड, लातूर-४१३५१२

फोन नं. ०२३८२-२४०१९२ फॅक्स-०२३८२-२४३८५५ ई-मेल:- channabasweshwar@gmail.com वेबसाईट:-www.cdphl.org

महाराष्ट्र शासन, अ.भा.त.शि.परिषद व फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया नवि दिल्ली यांची मान्यता प्राप्त व म.रा.त.शि. मंडळ यांच्याशी सलग्नीत.


## सरळ सेवेने वर्ग-३ पद भरीती जाहिरात

शासन अनुदानीत संस्थेत प्रयोगशाळा तंत्रज्ञ, लेखा लिपीक, भांडारपाल व सहाय्यक ग्रंथपाल (प्रत्येकी एक पद) या पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उपरोक्त पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता / अर्हता, वेतन श्रेणी, वयोमर्यादा, अनुभव तसेच इतर अटी व शर्तीसाठी सविस्तर जाहिरात खालील संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१. www.cdphl.org
२. www.dteau.org

प्राचार्य
चन्नबसवेश्वर (पॉलिटेक्निक) कॉलेज, लातूर

सचिव
पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट आलूर,

---

(डॉ. एस. एस. थोंटे)
प्राचार्य
चन्नबसवेश्वर (पॉलीटेक्नीक)
कॉलेज, लातूर

संस्थेतील शिक्षकेत्तर वर्ग-३ पद भरतीसाठी संकेत स्थळावर प्रसिध्द करावयाचा सविस्तर जाहिरातीचा मसूदा


**शासन अनुदानीत** डि.टी.ई. कोड नं.-२०२५ व एम.एस.बी.टी.ई.कोड नं.-००५२

पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, आलूर द्वारा संचलित स्थापना १९७३

# चन्नबसवेश्वर (पॉलिटेक्निक) कॉलेज, लातूर

बसवेश्वर चौक, कव्हा रोड, लातूर-४१३५१२

फोन नं. ०२३८२-२४०१९२ फॅक्स-०२३८२-२४३८५५ ई-मेल:- channabasweshwar@gmail.com वेबसाईट:-www.cdphl.org

महाराष्ट्र शासन, अ.भा.त.शि.परिषद व फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया नवि दिल्ली यांची मान्यता प्राप्त व म.रा.त.शि. मंडळ यांच्याशी सलग्नीत.


## शिक्षकेत्तर वर्ग-३ पद भरती

शासन अनुदानीत औषध निर्माण शास्त्र पदविका संस्थेतील खालील शिक्षकेत्तर वर्ग-३ पदे भरावयाची असल्याने सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत असून पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्रं | पदाचे नाव (सातव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी रुपये) | पद संख्या | आरक्षण | शैक्षणीक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (एस-८ रु. २५५००-८११००) | ०१ | अ.जा. (S.C.) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एस.एस.सी) परीक्षा उतीर्ण, औषध निर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम उतीर्ण, किमान तीन वर्षे औषध निर्माणशास्त्र प्रयोगशाळा वा तत्सम ठिकाणी कामाचा अनुभव व हिंदी, मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| २ | लेखा लिपीक (एस-६ रु. १९९००-६३२००) | ०१ | खुला (Open) | कोणत्याही शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापीठातून पदवी, मराठी टंकलेखन किमान ३० शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी टंकलेखन किमान ४० शब्द प्रति मिनिट वेग मर्यादेचे शासकिय वाणिज्यचे प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र, हिंदी, मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ३ | भांडारपाल (एस-१० रु. २९२००-९२३००) | ०१ | खुला (Open) | वाणिज्य किंवा विज्ञान पदवी मान्यता प्राप्त विद्यापीठातून पदवी उतीर्ण केलेला असावा. भांडार विभागामध्ये काम करण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा. मराठी टंकलेखन किमान ३० शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी टंकलेखन किमान ४० शब्द प्रति मिनिट वेग मर्यादेचे शासकिय वाणिज्यचे प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र, हिंदी, मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| ४ | सहाय्यक ग्रंथपाल (एस-७ रु. २१७००-६९१००) | ०१ | खुला (Open) | माध्यमिक शालांत प्रमाणत्र (एस.एस.सी) परीक्षा उतीर्ण, ग्रंथालयासाठी विहित केलेली शासन मान्य प्रमाणपत्र परीक्षा उतीर्ण, ग्रंथालयात किमान तीन वर्षे काम केल्याचा अनुभव. मराठी टंकलेखन किमान ३० शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी टंकलेखन किमान ४० शब्द प्रति मिनिट वेग मर्यादेचे शासकिय वाणिज्यचे प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र, हिंदी, मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |

श्री सोनकांबळे ए. एस

(डॉ. एस. एस. थोटे)
प्राचार्य
चन्नबसवेश्वर (पॉलीटेक्नीक)
कॉलेज लातूर

टीप :

१. वरील सर्व पदांसाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे (MS-CIT) संगणक प्रशिक्षण परीक्षा उतीर्ण असणे आवश्यक आहे.

२. **वयोमर्यादा**:- उमेदवाराचे वय १९ वर्ष पेक्षा कमी आणि ३८ वर्ष पेक्षा जास्त नसावे तसेच मागासवर्गीय पदांसाठीच्या व्यक्तीची वयोमर्यादा ४३ वर्ष पेक्षा जास्त नसावी. अर्जासोबत उमेदवारांने शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणीत चित्रप्रत जोडणे आवश्यक आहे.

३. निवड प्रक्रियेत निवड समितीचा निर्णय हा अंतिम निर्णय राहिल.

४. कांही अपिरीहार्य कारणात्सव निवड प्रक्रिया स्थगीत किंवा रद्द झाल्यास अर्ज दारास नेमणूकी संदर्भात कोणताही दावा सांगता येणार नाही.

५. मागास प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्य अधिनिवासी उमेदवारांपूरते मर्यादीत राहील, मागास प्रवर्गातील पदांसाठी अर्जदारांने सक्षम अधीकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास तात्पूर्ती नियुक्ती आदेश दिल्यापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सदर सवलत फक्त महाराष्ट्रातील उमेदवारांना लागू राहील. अन्य उमेदवारांची नियुक्ती पूर्वलक्षीप्रभावाने रद्द करण्ययात येईल.

६. उमेदवारांना लेखी परीक्षेस व मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

७. उमेदवारांने किमान कौशल्य, रोजगार व उद्योजकता कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास नोंदणी क्रमांक अर्जात स्पष्ट नमुद करुन प्रमाणपत्राची चित्रप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. अर्जदाराने अर्जासोबत स्व प्रमाणीत (Self Attested) दाखल केलेल्या सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रती कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.

९. सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी यथायोग्य मार्गाने (Through Proper Channel) अर्ज करणे आवश्यक असून त्यांनी अर्जासोबत कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणत्राची स्व प्रमाणीत (Self Attested) चित्रप्रत दाखल करणे आवश्यक असून मुलाखती वेळेस मुळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०. अर्जासोबत महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना (अ) या विहित नमुण्यात कुंटुंब मर्यादा प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

११. दि. ०१.११.२००५ नंतर नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना अंशदायी पेंशन योजना / राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली (एन.पी.एस.) लागू राहील.

१२. जाहिरातीत नमुद पद संख्या अतिरीक्त कर्मचारी समावेशन अथवा अन्य कारणास्तव बदलू शकेल.

१३. एखादया उमेदवारांने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष राजकिय अथवा अन्य प्रकारे दबाव आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरवीण्यात येईल.

१४. प्रमाणपत्राच्या प्रती स्व प्रमाणीत (Self Attested) जोडाव्यात, मुदती नंतर कोणतेही प्रमाणपत्र अथवा प्रमाणपत्राच्या प्रती स्विकारले जाणार नाहीत.

१५. उमेदवारांनी दिलेली माहिती, प्रमाणपत्रे खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास निवड / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

१६. पद निहाय आवश्यक अनुभवासाठी पूर्ण वेळ कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल.

१७. अर्ज टंकलीखीत किंवा छापील असावा, अर्जात अचूक व संपूर्ण माहिती भरलेली असावी.

(डॉ. एस. एस. थोंटे)
प्राचार्य
चन्नबसवेश्वर (पॉलीटेक्नीक)
कॉलेज, लातूर

१८. अर्ज करण्यापूर्वी अर्जदाराने जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती काळजी पूर्वक वाचून अर्ज करावेत.

१९. अर्जदाराने मुलाखतीच्या वेळी आपले छायाचित्र असलेले आळखपत्र सोबत आणने आवश्यक आहे.

उपरोलेखीत शिक्षकेत्तर पदांसाठी पात्र उमेदवारांनी प्राचार्यांच्या नावे टंकलिखीत अथवा छापील अर्ज करुन अर्जासोबत शैक्षणीक व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या स्व प्रमाणीत (Self Attested) चित्रप्रती जोडणे आवश्यक आहे. जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांका पासून पंधरा दिवसाच्या आत अर्ज प्रत्यक्ष अथवा पोस्टाने पोंच होणे आवश्यक राहिल.

**प्राचार्य**
चन्नबसवेश्वर (पॉलिटेक्निक) कॉलेज, लातूर

**सचिव**
पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट आलूर,

---

**(डॉ. एस. एस. थोंटे)**
**प्राचार्य**
**चन्नबसवेश्वर (पॉलीटेक्नीक)**
**कॉलेज, लातूर**